निवडसूची सन २०१३-१४
पोलीस उप अधीक्षक / सहायक
पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गात
पदोन्नती देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्र: रापोसे-०११४/प्र.क्र.२१३/पोल-१अ,
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२
दिनांक :- ३१ डिसेंबर, २०१५.

शासन आदेश -

पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१३-१४ च्या तदर्थ निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षक संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांची आपसातील ज्येष्ठता (Inter-se-seniority) नंतर निश्चित करण्यात येईल. सदर अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	सध्याची पदस्थापना
१	श्री. शिरीष देवीसिंग राठोड (वि.जा.-अ)	अमरावती शहर
२	श्री. सदाशिव विष्णूपंत चौधरी (अ.जा.)	नागरी हक्क संरक्षण, भंडारा
३	श्री. राजेंद्रसिंग गोविंदसिंह परदेशी (खुला)	बृहन्मुंबई
४	श्री. ओमप्रकाश धोंडीराम माने (भ.ज.-क)	बीड
५	श्री. रमाकांत कृष्णाजी खरात (अ.जा.)	बृहन्मुंबई
६	श्री. अब्दुल रफिक अब्दुल रहमान शेख (खुला)	बृहन्मुंबई
७	श्री. अजिझ गुलाब मांजर्डेकर (खुला)	बृहन्मुंबई
८	श्री. जयकर राजाराम चक्रे (अ.जा.)	औरंगाबाद शहर
९	श्री. प्रविण चिंतामण चिंचाळकर (खुला)	बृहन्मुंबई
१०	श्री. चंद्रशेखर श्रीमंतराव कदम (खुला)	पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा

२. पदोन्नती देण्यात आलेल्या, ज्या अधिकाऱ्याविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित किंवा प्रस्तावित आहे, अशा अधिकाऱ्यांविरूध्द सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २.०४.१९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार त्यांच्याविरूध्द प्रलंबित किंवा प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीच्या / न्यायालयीन कार्यवाहीच्या अधीन राहून, त्यांना तात्पुरत्या

स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांच्याविरूध्द प्रलंबित किंवा प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना वरीलप्रमाणे पदोन्नती देण्यात यावी.

३. उपरोक्त पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. २७९७/२०१५ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५१२३११५५४१५६६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2b0496c0c213a3f50c6522cc39ae5de95e1150ac3287e89c21b1422e313820a2, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2015.12.31 19:29:11 +05'30'

(चारूशीला तांबेकर)
सह सचिव, गृह विभाग

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतिलिपि,

१) महालेखापाल - १, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामिण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व संबंधीत कार्यालये,
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१०) सर्व संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी,
११) सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१२), मंत्रालय, मुंबई,
१२) सर्व संबंधित पोलीस अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत)
१३) निवड नस्ती (कार्यासन पोल-१अ)